सातारा जिल्हा परिषद,सातारा

सामान्य प्रशासन विभाग

कार्यालयाचा पत्ता : जिल्हा परिषद मुख्य इमारत, ४था मजला, सातारा-कोरेगांव रोड, सदर बझार कॅंप ता.जि.सातारा.

कार्यालय दुरध्वनी क्रं ०२१६२-२९५०५३ Email-dyceogadstr@gamil.com


वाचून :- मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.सातारा यांचेकडील परिपत्रक क्र. आस्था-२(३)/परिपत्रक/ कावि/१३७ /२०२१ दिनांक -२५ मार्च २०२१.

-०-०-०-०-०-०-०-०-०-०-०-०-०-०-०-०-०-०-०-०-०-०-०-०-०-०-०-०-०-०-०-०-०-०-

जा.क्र.साप्रवि/आस्था-२(३)/१३८/२०२१

दिनांक -२५/०३/२०२१

आदेश

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.सातारा यांचेकडील परिपत्रक क्र. आस्था-२(३)/परिपत्रक/ कावि/१३७ /२०२१ दिनांक -२५मार्च २०२१ अन्वये कोव्हिड -१९ च्या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद मुख्यालयातील गर्दी कमी करुन प्रशासनास कामकाजासाठी पुरेसा वेळ देणे व कोरोनाच्या पार्श्वभूमीवर प्रादुर्भाव कमी व्हावा म्हणून अभ्यागतांनी / नागरिकांनी त्यांचे अर्ज, निवेदने, मागणी - सुचनापत्र इत्यादी सर्व ऑनलाईन करण्याबाबत अभ्यागत/नागरिक, लोकप्रतिनिधी, क्षेत्रीय अधिकारी/कर्मचारी यांनी " ई- टपाल प्रणाली " चा जास्तीत जास्त वापर करण्यासाठी आवाहन केले आहे.

त्या अनुषंगाने तुम्ही अभ्यागत/नागरिक, लोकप्रतिनिधी, क्षेत्रीय अधिकारी/कर्मचारी यांचेकडून " ई- टपाल प्रणालीव्दारे zpstretapal@gmail.com या ई- मेल आयडीवर प्राप्त होणारे अर्ज, निवेदने, मागणी - सुचनापत्र संबंधित विभागास त्याच दिवशी सायंकाळी ६.१५ पर्यंत वर्ग करण्याचे आहे.

तसेच अभ्यागत/नागरिक, लोकप्रतिनिधी, क्षेत्रीय अधिकारी/कर्मचारी यांचेकडून " ई- टपाल प्रणालीव्दारे प्राप्त होणारे अर्ज, निवेदने, मागणी - सुचनापत्र याबाबतचा अहवाल दररोज सकाळी ११.०० वाजेपर्यंत सामान्य प्रशासन विभाग, जि. प. सातारा कडे खालील नमुन्यात सादर करावयाचा आहे.

| अ.क्र. | तपशील | शेरा |
|---|---|---|
| १ | दिनांक / २०२१ रोजी प्राप्त अर्ज , निवेदने, मागणी - सुचनापत्र | |
| २ | कोणत्या विभागास किती अर्ज , निवेदने, मागणी - सुचनापत्र वर्ग केली | |

सदर आदेशाची अंमलबजावणी तत्काळ करण्याची आहे.

विनय गौडा जी सी (भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
सातारा जिल्हा परिषद,सातारा

प्रति.

श्री. नटराज पाटील
जिल्हा प्रकल्प प्रमुख, जिल्हा परिषद सातारा

प्रत:- खातेप्रमुख (सर्व), --------------जि.प.सातारा

२/- ई-टपाल प्रणालीव्दारे प्राप्त अर्जावर वेळेत कार्यवाही करण्याची दक्षता घेण्यात यावी.